# विशेष प्रेस नोट

# पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर

## चालक पोलीस शिपाई भरती -२०१९

उमेदवारांसाठी महत्वाची सुचना

(कागदपत्रे पडताळणी, शारीरिक मोजमाप व वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी बाबत)

➢ कागदपत्रे तपासणी, शारिरीक तपासणी व वाहन चालविण्याचे कौशल्य चाचणी करीता पात्र ठरलेल्या उमेदवारांनी चालक पोलीस शिपाई भरती २०१९ च्या अनुषंगाने प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार त्यांचे मुळ कागदपत्रे आणि सदर कागदपत्रांच्या छायांकीत प्रतीचे दोन संच व **पासपोर्ट साईजचे ४ फोटो (रंगीत)** सह **दिनांक २५.१०.२०२१ रोजी सकाळी ०६.०० वाजता पोलीस कवायत मैदान, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे न चुकता उपस्थित राहावे.**

➢ पात्र उमेदवारांचे कागदपत्रे पडताळणी झाल्यानंतर, लगेच शारीरिक मोजमाप (छाती व उंची) घेण्यात येईल. तसेच त्यांनतर वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी घेण्यात येईल. सदची प्रक्रीया ही दि. २५.१०.२०२१ पासून राबविण्यात येत असल्याने उमेदवारांनी तशा तयारीनिशी नमुद ठिकाणी हजर राहावे.

➢ उमेदवारांनी कागदपत्रे तपासणी, शारिरीक तपासणी व वाहन चालविण्याचे कौशल्य चाचणी करीता हजर राहतेवेळी कोरोना नियमाचे पालन करणे बंधनकारक असल्याने सोबत स्वत:चे मास्क व सॅनिटायझर घेवून यावे. सर्व उमेदवारांची पल्स ऑक्सीमिटर व शारिरीक तापमानाची तपासणी करण्यात येणार आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी.

➢ **जे उमेदवार दिलेल्या विहीत वेळेत हजर राहणार नाही, त्यांना गैरहजर समजून चालक पोलीस भरती प्रक्रीयेतून अपात्र करण्यात येईल याची सर्व संबधीत उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

➢ **उन्नत व प्रगत गटात ( नॉन क्रिमिलियर) मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (SC/ST वगळुन) दिनांक ३१/१२/२०१९ पुर्वीचे असलेले**

➢ **वाहन चालविण्याचा LMV किंवा LMV-TR वैध परवाना (०८/०१/२०२० पुर्वीचे) असलेले**

( डॉ. आरती सिंह )
पोलीस आयुक्त, अमरावती शहर

**प्रति,**
मा. संपादक,
दैनिक---------------------------------,अमरावती

२/- उपरोक्त माहिती जनहितार्थ असल्याने कृपया आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करावी. ही विनंती.

**प्रत**- पोलीस निरीक्षक- सायबर पोलीस ठाणे, अमरावती शहर

३/- उपरोक्त माहिती आयुक्तालयाच्या शासकिय संकेतस्थळ /फेसबुक/ इन्स्टाग्राम व इतर समाजमाध्यमावर प्रसिध्द करावी तसेच कागदपत्र पडताळणी, शारिरीक चाचणीकरीता व वाहन चालविण्याचे कौशल्य चाचणीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांना उपरोक्त वेळापत्रकाप्रमाणे उपस्थीत राहण्याबाबत Bulk SMS सुविधेव्दारे कळविण्यात यावे.